जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ६७ दिनांक -२५/०१/२०२५

नांदेडसिटी पोलीस स्टेशन, पुणे शहर

### डी.एस.रोड धायरी पुणे येथे जबरी चोरी करणारे गुन्हेगार जेरबंद

नांदेडसिटी पोलीस स्टेशन हद्दीतील डी.एस.के. रोड ते रायकर मळा येथे काही मुले गाडया अडवतात आणि घरी मेडीकल इमर्जन्सी आहे. असे सांगुन गाडीत बसतात व गाडी घरी घेण्यास सांगुन निर्जन स्थळी नेऊन मारहाण करतात व पैसे, मोबाईल व पाकीट घेऊन जातात. त्यामुळे रहिवाश्यांमध्ये भीतीचे वातावरण असलेबाबत एक मेसेज सोशल मिडीयावर फिरत होता, सदर मेसेजच्या अनुषंगाने मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पुणे शहर यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नांदेडसिंटी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांना दिलेल्या सुचनाप्रमाणे तपास पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सदर वायरल मेसेजबाबत खात्री करुन आरोपीवर कारवाई करण्यास सांगितली .

दि.२४/१/२०२५ रोजी डीएसके रोड ते रायकर मळर या भागातील निर्जनस्थळी ट्रॅप लावला असता रायकर मळा भागातील मारुती मंदिराच्या मागील निर्जनस्थळी काही मुले एका व्यक्तीला मारहाण करत असलेबाबत पोलीस अंमलदार पुरुषोत्तम गुन्ला, अक्षय जाधव यांना मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने लागलीच सदर ठिकाणी जाऊन सदर मुलांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे नमुद मेसेजच्या अनुषंगाने चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, Grandr ॲपमध्ये गे लोक असुन आम्ही त्यांच्याशी चॅटींग करुन त्यांना भेटण्यासाठी निर्जन ठिकाणी घेऊन जाऊन त्यांच्याकडुन जबरदस्ती पैसे, मोबाईल, सोने काढुन घेतलेबाबत सांगितल्याने सदर व्यक्तीचा शोध घेऊन त्यांना पोलीस स्टेशन येथे नेवुन त्यांचा जबाब नोंद करुन गु.र.नं. ५३/२०२५, बीएनएस ३०९(४), ३(२५) अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर गुन्हयात आरोपी नाव **भारत किसन धिंडले, वय १८ वर्षे, रा. फ्लॅट नं.२२, मुक्ताई हाईटस्, सांगळे घाट, भैरवनाथ मंदिराच्या मागे, धायरी, पुणे** यास अटक करण्यात आली असुन त्यांचे ३ साथीदार विधीसंघर्षित बालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे शहर, श्री. प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ- ३ पुणे, श्री. संभाजी कदम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, कोथरुड विभाग पुणे श्री. बापुसाहेब पठारे यांचे मार्गदर्शनाखाली नांदेडसिटी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अतुल भोस, तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप निरीक्षक शिवाजी बुनगे, पोलीस अंमलदार पुरुषोत्तम गुन्ला, योगेश झेंडे, राजु वेंगरे, अक्षय जाधव, प्रशांत काकडे, मोहन मिसाळ यांच्या पथकाने केली आहे.